# प्रकरण-18

# मॅन्युअल XVII

## लहान पुस्तिका(17)

माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत प्रकरण - दोन खंड (4)(1)(ख)(सतरा) अन्वये अशी इतर माहिती

मतदारांची संख्या, जनगणनेच्या आधारे लोकसंख्या आणि category-wise निवडणूक प्रभागांची संख्या यांची माहिती खालीलप्रमाणे.

| माहितीचे वर्णन | 2012 | 2017 | 2022** |
|---|---|---|---|
| 1) जनगणनेच्या आधारे लोकसंख्येची आकडेवारी | 1,19,78,450 | 1,24,42,373 | 1,24,42,373 |
| 2) मतदारांची संख्या | | | |
| पुरूष | 57,20,306 | 50,30,363 | 53,94,917 |
| स्त्रिया | 45,66,273 | 41,49,753 | 45,21,250 |
| इतर | - | 381 | 883 |
| एकूण | 1,02,86,579 | 91,80,497 | 98,77,050 |
| 3) निवडणूक प्रभाग | 227 | 227 | 236 |
| 4) वर्गीकृत जातींकरिता<br>अ) राखीव प्रभाग | 11(6+5*) | 15(7+8*) | 15(7+8*) |
| ब) वर्गीकृत जमातींकरिता राखीव प्रभाग | 2(1+1*) | 2(1+1*) | 2(1+1*) |
| क) मागासवर्गाच्या नागरिकांसाठी राखीव | 61(31+30*) | 61(30+31*) | 63(31+32*) |
| ड) स्त्रियांसाठी राखीव (वर नमूद केलेल्या राखीव जागा पकडून) | 114 | 114 | 118 |
| 5) मतदानाची टक्केवारी | 44.75% | 55.59% | - |

* असे चिन्ह असलेले आकडे स्त्रियांसाठी राखीव संख्या दर्शवितात.

** सन 2022 च्या तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली माहिती ही मा. राज्य निवडणूक आयोग यांजकडून दिनांक 31.07.2022 पर्यंत प्राप्त झालेले आदेशानुसार वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या माहितीवरून नमूद करण्यात आलेली आहे.

ii) **फेब्रुवारी 2017 मध्ये झालेल्या निवडणूकीत निवडून आलेल्या सध्याच्या महापालिकेविषयी सर्वसाधारण सांख्यिकी व इतर माहिती –**

थेट निवडणूकीने निवडण्यात आलेले – एकूण 227 नगरसेवक

नगरसेवकांविषयी माहिती, राखीव जागा इ.

| अ.क्र | वर्गवारी | मुंबई महानगरपालिका अधिनियमांन्वये राखीव | एकूण जागा | स्त्रियांसाठी राखीव | सामान्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अनुसूचित जातींच्या सभासदांसाठी | मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या 5 ए (2) (अ) | 15 | 8 | 7 |
| 2 | अनुसूचित जमातीच्या सभासदांसाठी | मुंबई महानगरपालिका अधिनियम 5 (अ) (3) (अ) अन्वये | 2 | 1 | 1 |
| 3 | नागरिकांचा मागासवर्गीय प्रवर्ग सदस्यासाठी | मुंबई म.न.पा. अधिनियम 5 ए (4) (अ) अन्वये | 61 | 31 | 30 |
| 4 | स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती अनुसूचित जमाती आणि नागरीकांचा मागासवर्ग स्त्रियांसाठी राखीव जागा पकडून) | मुंबई म.न.पा. अधिनियम 5 ए (5) अन्वये | 114 | 40 (8+1+31) | 74 |

दिनांक 25.11.2016 च्या असाधारण राजपत्र क्र.141 मध्ये छापल्याप्रमाणे खाली नमूद केलेले प्रभाग उपरोक्त नमूद केलेल्या प्रवर्गासाठी राखीव –

सदस्य संख्या तसेच आरक्षित जागा, इत्यादीचा तपशील

i. एकूण निवडावयाच्या सदस्यांची संख्या — 227

ii. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यासाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या

अ) अनुसूचित जाती — 15

ब) अनुसूचित जमाती — 02

क) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग — 61

iii. स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या 40 मागासवर्गाच्या स्त्रियांसह राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

iv. उपरोक्त क्र (iii) पैकी वरील अ.क्र.(ii)(अ), (ii)(क), येथे दर्शविलेल्या जागांपैकी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांसह राखून ठेवावयाच्या जागांची संख्या खालीलप्रमाणे राहील.

अ) अनुसूचित जाती — 08

ब) अनुसूचित जमाती — 01

क) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग — 31

v. सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या अ.क्र(iii) — 74

समोरील नमूद केलेल्या जागा वजा अनुक्रमांक (iv) समोरील नमुद
केलेल्या जागा)

vi. अराखीव जागा 75

iii) मुंबई महापालिका अधिनियम कलम 26 (अ) अन्वये (आणि वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनपर संहिते अन्वये) प्रत्येक उमेदवाराला नामनिर्देशन कालावधीच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी रोख रुपये 5000/- इतकी अनामत रक्कम भरावी लागेल आणि जर उमेदवार अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग असल्यास त्यांना रोख रू.2500/- इतकी अनामत रक्कम भरावी लागेल.

**निवडणूकीचा निकाल जाहीर करणे –**

मुंबई महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या उपबंधाच्या कलम 10 आणि 32 अन्वये प्रत्येक निवडणुकीचा निकाल जाहीर केला जातो आणि शासकीय राजपत्रात प्रसिध्द केला जातो तसेच महानगरपालिकेच्या कार्यालयात ठळकपणे दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित केला जातो.

iv) **निवडणुकी संदर्भातील आक्षेप** – जर एखाद्या निवडून आलेल्या नगरसेवकाच्या अर्हतेबाबत आक्षेप असल्यास किंवा एखाद्या निवडणुकीच्या वैधतेबाबत प्रश्न उपस्थित झालेला असल्यास आणि त्या कारणाने योग्य त-हेने नामनिर्देशन नाकारले किंवा अयोग्य त-हेने प्राप्त झालेले किंवा मतदाराला नाकारणे किंवा इतर एखाद्या कारणासाठी पिडित व्यक्ती/पक्ष लघूवाद न्यायालयाच्या न्यायाधिशांसमोर मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 33(1) अन्वये 10 दिवसांत निवडणूक दावा दाखल करू शकतात.

v) **नामनिर्देशनाची अनामत रक्कम परत करणे –**

अधिनियमाच्या कलम 26 ए मध्ये नमूद केल्याप्रमाणे नामनिर्देशनाची अनामत रक्कम खालील कारणास्तव परत करता येते -.

अ) जर उमेदवार निवडून आला आहे असे जाहीर केले आहे किंवा तसे मानण्यात आले तर

ब) नामनिर्देशनाच्या दिवसानंतर (तीन दिवसांपेक्षा) उशिरा नसेल अशा काळात उमेदवाराने निवडणूक न लढविण्याचा आपला इरादा आयुक्तास लेखी कळविला असेल तर

क) उमेदवाराचे नामनिर्देशन विधी अग्राह्य ठरविले तर

ड) उमेदवार नामनिर्देशनपत्राची छाननी झाल्यानंतर आणि मतदानाला सुरूवात होण्यापूर्वी मरण पावला तर

इ) एकूण वैध मतांच्या 1/8 पेक्षा जास्त वैध मते मिळवू शकला.

vi) **पालिका सदस्य होण्यासाठी निरर्हता** – बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 5 (ब) आणि 16 अन्वये नगरसेवकपदी निवडून येण्यास आणि पालिका सदस्य राहण्यास निरर्ह होईल.

vii) विभागीय आयुक्त, महसूल कार्यालय येथे महानगरपालिकेतील नगरसेवक म्हणून नोंदणी करणे –

सभासदांच्या अनर्हतेविषयी स्थानिक प्राधिकरण कायदा 1986 च्या कलमांन्वये महापालिकेत पद ग्रहण करण्यापूर्वी सर्वसाधारण/पोट-निवडणूकीत निवडून आलेल्या उमेदवाराने त्याचे नांव विभागीय आयुक्त महसुल कार्यालय येथे नोंदणी केली पाहिजे.

**जोडपत्र - 1**

**मुंबई महानगरपालिका अधिनियमातील निवडणूक अपराध या संदर्भातील संबंधित अनुबंध**

कलम 27 (अ) - मतदान केंद्रात किंवा त्यांच्या जवळपास प्रचार करण्यास मनाई

कलम 27 (अअ) - मतदानाच्या दिवसाच्या अगोदरच्या दिवशी व मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सभा घेण्यास मनाई.

कलम 27 ब - मतदान केंद्रात किंवा त्यांच्या जवळपास बेबंद वर्तणूक केल्याबद्दल शास्ती

कलम 27 क - मतदान केंद्रात गैरवर्तणूक केल्याबद्दल शास्ती

कलम 28 ब - निवडणूकीच्या संबंधातील अधिकारी वगैरे यांनी उमेदवाराच्या वतीने काम न करणे किंवा मतदानाच्या बाबतीत वजन खर्च न करणे.

कलम 28 क - निवडणूकांच्या संबंधातील कार्यालयीन कर्तव्याचा भंग.

कलम 28 ड - मतदान केंद्रातून मतपत्रिका काढून नेणे हा अपराध असणे.

कलम 28 ई - इतर अपराध व त्याबद्दल शास्ती.

कलम 28 फ - भ्रष्टाचार म्हणजे काय.

कलम 28 ग - भ्रष्टाचार, फौजदारी अपराध व कार्यपध्दती.

कलम 28 ह - निकडीच्या परिस्थितीत मतदान स्थगित करणे.